


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
**पुण्यातील लोकप्रिय दैनिक**



● वर्ष : ०१ ● अंक : २३९ ● शुक्रवार, दि. १४ जून २०२४ ● टी.सी.नं. - एमएएचएमआर५२३२५ ● एसडीएम नं. - एसडीएम/एसआर.६०/२०२३ ● पुणे ● मराठी दैनिक (रविवार सोडून) ● पाने ४ ● किंमत : २ रूपये
● Volum : 1 ● Issue : 239 ● Friday, 14 June 2024 ● Title Code. - MAHMAR52325 ● SDM No. SDM/SR/60/2023 ● Pune ● Marathi Dainik (Monday To Saturday) ● Page : 4 ● Price : 2 Rs/-



नोंदणी महानिरीक्षक सोनावणे यांना निलंबित करा 3



करण जोहर व मनीष मल्होत्रा यांच्या हस्ते लोगोचे अनावरण 4

# एकाच परिवारात तीन खासदार

## पुण्याची राजकीय पॉवर, पुण्याला सात खासदारानंतर केंद्रात वजन वाढणार



**पुणे (दै. आरंभ पर्व)** पुणे जिल्ह्यात लोकसभेचे चार मतदार संघ आहे. पुणे शहर, मावळ, शिरूर आणि बारामती या चार लोकसभा मतदारसंघाची निवडणूक नुकतीच झाली. त्यात महायुतीचे दोन तर महाविकास आघाडीचे दोन खासदार विजयी झाले. पुणे शहरातून भाजपचे मुरलधीर मोहोळ पहिल्यांदा लोकसभेवर गेले आहे. ते सरळ केंद्रात राज्यमंत्री झाले आहेत. बारामतीमधून शरद पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या सुप्रिया सुळे विजयी झाल्या आहेत. त्यांनी सुनेत्रा पवार यांचा पराभव केला. मावळमधून महायुतीमधील शिवसेनेचे श्रीरंग बारणे विजयी झाले आहेत. तर शिरूरमधून राष्ट्रवादी शरद पवार गटाचे डॉ.अमोल कोल्हे विजयी झाले आहेत.

राज्यसभेत पुणे जिल्ह्यातून तीन खासदार आहेत. शरद पवार राज्यसभेचे खासदार आहे. त्यानंतर मेधा कुलकर्णी राज्यसभेवर खासदार झाल्या आहेत. तसेच आता सुनेत्रा पवार राज्यसभेवर जात आहेत. त्यामुळे लोकसभेतील चार आणि राज्यसभेतील तीन खासदार पुणे जिल्ह्यातून जात आहे. पुण्यातून सात खासदार झाल्यामुळे पुण्याचे राजकीय वजन वाढणार आहे. तसेच राज्यात आतापर्यंत कोणत्याही जिल्ह्यातून सात खासदार झाले नाही. तो विक्रम पुणे जिल्ह्याच्या नावावर झाला आहे.

पुण्यात सात खासदार होत असताना आणखी एक विक्रम होत आहे. एकाच परिवारातून आणि एकाच गावातील तीन जण खासदार होत आहे. पवार कुटुंबातील तीन जण खासदार होत आहे. शरद पवार राज्यसभेवर खासदार आहेत. त्यांच्या कन्या सुप्रिया सुळे लोकसभेवर निवडून आल्या आहेत. तसेच आता अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार खासदार होत आहे. अजित पवार राज्यात मंत्री आणि उपमुख्यमंत्री आहेत.

आता सात खासदारांनी आपल्या पॉवरचा वापर केल्यास पुणे जिल्ह्याचा विकास सुसाट होणार आहे. पुणे शहरातील अनेक प्रश्न मार्गी लागणार आहे. कारण सात खासदार अन् एक केंद्रीय मंत्री पुण्याकडे आहेत. मेट्रोचा विस्तार, आंतरराष्ट्रीय विमानतळ, नदी सुधार, एमआयडीसी हे विषय मार्गी लागणार आहे. रिंग रोडचा रखडलेला विषय सुटण्याची शक्यता आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कॅबिनेटमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या अजित पवार गटाला स्थान न मिळाल्याने त्याची मोठी चर्चा झाली. तर दुसरीकडे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडून अजित पवार यांना सोबत घेतल्याने निवडणुकीत फटका बसल्याचा हल्लाबोल झाला. त्यामुळे नाराजी वाढली होती. लोकसभेत अजित पवार गटाला एक जागा मिळाली आहे. त्या आधारावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मंत्रिमंडळात प्रफुल्ल पटेल यांना राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) ऑफर देण्यात आली होती. पण ही बोळवण असल्याचे लक्षात येताच, ज्येष्ठतेचे कारण देत अजित पवार गटाने त्याला नकार दिला होता. यापूर्वी कॅबिनेट पदी काम केल्यानंतर राज्यमंत्री पद काम करणे योग्य नसल्याचे प्रफुल्ल पटेल यांनी स्पष्ट केले होते. अजित पवार गट नाराज असल्याचे समोर आल्यानंतर भाजपने ही नाराजी दूर करण्यासाठी एक फॉर्म्युला शोधला आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते प्रफुल्ल पटेल यांच्या रिक्त झालेल्या जागेवर राज्यसभेची पोटनिवडणूक होत आहे. या पोटनिवडणुकीसाठी अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी अर्ज भरला. त्यांना संसदेत मागील दाराने पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. यापूर्वी एका जागा भाजप कोट्यातून देणार असल्याची चर्चा होती.









# छोट्या उद्योग व्यवसायासाठी अनुमानित कर आकारणी







व्यवसाय सुरू करण्याचे अनेक पर्याय आहेत. त्यासाठी कंपनीची स्थापना केलीच पाहिजे असं कोणतंही बंधन नाही. नवीन उपक्रम कार्यान्वित करण्यासाठी असलेले विविध पर्याय हे व्यवसायाचं स्वरूप आणि आकारमान यावर ठरतात. कालांतराने त्यात बदल केले जातात. सध्या उपलब्ध असलेले महत्त्वाचे पर्याय असे आहेत.

एकमेव मालकी
भागीदारी किंवा मर्यादित
दायित्व भागीदारी
एकल, खासगी किंवा
सार्वजनिक कंपनी
संयुक्त उपक्रम

या प्रत्येकाचे कमी अधिक फायदे-तोटे असून त्यात अनेक बारकावे आहेत. तुमचा व्यवसाय झपाट्याने वाढत असेल तर त्याच्या वृद्धीसाठी भागीदारी अथवा कंपनी हे पर्याय असू शकतात. त्याची स्वतंत्र नोंदणी करावी लागते, त्यांना व्यक्तीप्रमाणे स्वतंत्र आणि कायदेशीर अस्तित्व असते. या सर्वच उद्योजक व्यावसायिकांना व्यवसाय करत असताना काही निकष पूर्ण होत असल्यास हिशोबाची पुस्तके ठेवणे अनिवार्य आहे- उत्पन्न ₹ 120000/- किंवा एकूण विक्री, उलाढाल, पावत्या या मागील तत्काळ तीन वर्षांतील कोणत्याही एका वर्षात ₹ 1000000/- हून अधिक आहेत. ही अट व्यक्ती आणि हिंदू अविभक्त कुटुंब यांच्यासाठी शिथिल करण्यात आली असून त्यांना, उत्पन्न ₹ 250000/- हून अधिक किंवा विक्री, उलाढाल, पावत्या या मागील तत्काळ तीन वर्षांतील कोणत्याही एका वर्षात ₹ 2500000/- हून अधिक आहेत. या पद्धतीने लेखा नोंदी/हिशोब पुस्तके न ठेवल्यास ₹25000/- दंड होऊ शकतो. एका आर्थिक वर्षात ₹ 1 कोटीहून अधिक विक्री, उलाढाल, पावत्या असतील, तर त्याचे लेखापरीक्षण करणे आवश्यक आहे. आयकर विवरणपत्र फॉर्म 3 द्वारे मूल्यांकन वर्षाच्या 30 सप्टेंबरपर्यंत करणे आवश्यक आहे. सर्वसाधारणपणे मूल्यांकन केलेल्या विवरणपत्रात सुधारणा करता येत नाही. ज्या व्यवसायाच्या हिशोबाचे मूल्यांकन करावे लागत नाही त्याचे विवरणपत्र मूल्यांकन वर्षाच्या 31 जुलैपूर्वी सादर करावे. व्यावसायिकांना लेखापरीक्षण करण्यासाठी जे रेकॉर्ड कायद्यानुसार 6 F नुसार ठेवणे आवश्यक आहे. ते असे – कॅश बुक, जर्नल, लेजर यांच्या नोंदी नियमानुसार ठेवाव्या लागतात. किरकोळ खर्च पेटी कॅशमधून केले जातात, बिलाचे मूल्य अधिक असेल तर मूल्यानुसार यांच्या छायाप्रती तर त्याहून अधिक मूल्य असल्यास मूळ प्रति जपून ठेवायला लागतात. जर वैद्यकीय व्यवसायात असाल, तर दैनंदिन केस रजिस्टर ठेवून त्यात रुग्णाचा तपशील, प्राप्त शुल्क, प्रदान केलेली सेवा आणि पावतीची तारीख याची वेगळी नोंद ठेवणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे दैनंदिन आधारावर औषधे आणि उपभोग्य वस्तूंचा तपशील ठेवणे आवश्यक आहे. व्यक्ती किंवा हिंदू अविभक्त कुटुंबाचा यांचा वर दिलेल्या उत्पन्न मर्यादेत अथवा उलढालीच्या आतील व्यवसाय असल्यास वरीलपैकी कोणत्याही नोंदी ठेवणे आवश्यक नाही. नव्यानेच व्यापार सुरु करणाऱ्या व्यवसायिकाचे व्यवसाय वाढ करणे आणि नफ्यात वाढ करणे हे महत्त्वाचे उद्दिष्ट असते त्यासाठी आवश्यक वरील कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात त्यास मनुष्यबळ लावावे लागते अथवा स्वतः लक्ष घालावे लागते. यातून काहीतरी सूट मिळावी अशी उद्योगक्षेत्राची मागणी होती त्यास अनुसरून सन 2015 रोजी अनुमानित कर आकारणी योजना आणण्यात आली, या योजनेनुसार विमा एजंट, विविध प्रकारचे आयोग, प्रवासी वाहतूकदार, मोठ्या प्रमाणात मालवाहू गाड्या चालवणे भाड्याने घेणे अथवा देणे असे व्यवसाय सोडून सर्व व्यावसायिकांना – कलम 44 एडीनुसार 2 कोटीपर्यंत विक्री, उलाढाल, पावत्या असल्यास असे छोट्या व्यावसायिक याचा लाभ घेऊ शकतील. त्यांना कोणत्याही खातेवह्या ठेवाव्या लागणार नाहीत. अलीकडेच सन 2023 च्या अर्थसंकल्पात ही मर्यादा 3 कोटींपर्यंत वाढवण्यात आली आहे. यातील 95% व्यवहार ऑनलाइन असावेत, या व्यवहारात 6% आणि ऑफलाईन व्यवहारात 8% नफा झाला असे गृहीत धराण्यात आले आहे. कलम 44 एडीएनुसार डॉक्टर, वकील, अभियंता, सल्लागार यांसारख्या व्यावसायिकांची उलाढाल 50 लाख रुपये असल्यास त्यांना व्यवसायाचा खर्च म्हणून 50% वजावट मिळते. गेल्यावर्षी उलाढाल मर्यादा 75 लाख रुपये करण्यात आलेली आहे. त्यांना आपले विवरणपत्र फॉर्म 4 मध्ये भरावे लागते. केवळ 10 गाड्या किंवा त्याहून कमी असलेल्या 12 टनाहून कमी क्षमतेच्या मालवाहू वाहतूक व्यावसायिकांना प्रति गाडी प्रति महिना रु. 7500/- उत्पन्न, तर त्याहून मोठ्या गाडीस प्रतिटन रु. 1000/- उत्पन्न मिळते असे गृहीत धरून कलम 44 एइ खाली उत्पन्न दाखवून त्यानुसार अनुमानित कर योजनेचा लाभ घेता येतो. किरकोळ व्यापारी, व्यावसायिक आणि छोटे वाहतूकदार हे वर दिलेल्या मर्यादेहून अधिक उत्पन्न असेल तर ते जाहीर करू शकतात पण ते विहित मर्यादेहून कमी असल्यास त्याच्या काटेकोर नोंदी ठेवून लेखापरीक्षण करावे लागेल.

अनुमानित कर आकारणीचे फायदे – 44 एडीनुसार अनुमानित उत्पन्न उलढालीच्या 6% ते 8% मानले जाते, तर 44 एडीएनुसार व्यवसायाच्या खर्चास सरसकट 50% सूट दिली जाते. कोणत्या कायदेशीर खातेवह्या ठेवण्याची आवश्यकता नाही. लेखापरीक्षण करण्याची गरज नाही. कर आगाऊ भरावा लागत असला तरी तो प्रत्येक तिमाहीत भरण्याऐवजी 15 मार्चपर्यंत करभरणा केला तरी चालतो. दायित्व 10 हजारांहून अधिक नसेल, तर 31 मार्चपर्यंत करभरणा करता येईल. भारताबाहेरील गिऱ्हाईकांशी व्यवहार करत असल्यास व्यवसायिकास त्याच्या बँक खात्यात क्रेडिट मिळेल आणि परदेशी ग्राहकाने तेथील स्थानिक कायद्यानुसार पेमेंट करण्यापूर्वी मुळातून करकपात घेतला असेल तरी तो विवरणपत्र भरुन परत मिळवता येईल. जर कर कापला नसेल तर काळजीचे कारण नसून फक्त या पावत्या एकूण उत्पन्नात मिळवाव्या लागतील.

अनुमानित कर आकारणीचे तोटे – एकदा ही पद्धत स्वीकारली की उत्पन्न उलाढाल वाढल्याशिवाय किंवा 5 वर्षे त्यात बदल करता येत नाही. यात गृहीत धरलेल्या नफा अगर उलाढाल फायदेशीर नसल्यास त्यातून बाहेर पडल्यास पुन्हा पाच वर्षे पुन्हा ही पद्धत स्वीकारता येत नाही. उद्योग व्यावसायिकांना उपयुक्त होईल त्यांना किमान कर भरावा लागेल, अशी ही योजना असून अनेक व्यावसायिक त्याचा लाभ घेत आहेत. लागेल अशी ही योजना असून अनेक व्यावसायिक त्याचा लाभ घेत आहेत.

## बापदेव सहकारी दूध संस्थेच्या
# अध्यक्षपदी गणेश गोरडे यांची तर उपाध्यक्षपदी साहेबराव गोरडे यांची निवड



● गोसासी (ता.खेड) येथील बापदेव सहकारी दूध संस्थेच्या नवनिर्वाचित अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचा सन्मान करताना मान्यवर ●

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

गोसासी (ता.खेड) येथील बापदेव सहकारी दूध संस्थेच्या अध्यक्षपदी गणेश अर्जुन गोरडे यांची तर उपाध्यक्षपदी साहेबराव कोंडीबा गोरडे यांची निवड झाली. यावेळी दूध संस्थेचे संचालक व सभासद उपस्थित होते.

खेड तालुक्याच्या पूर्व भागातील अग्रगण्य दूध संस्था म्हणून या संस्थेची ओळख आहे. सन 1981 साली या दूध संस्थेची स्थापना करण्यात आली. संस्थेकडून दर वर्षी दूध उत्पादक शेतकऱ्यांना लाभांश देण्यात येतो. संस्थेच्या चांगल्या कारभारामुळे संस्था 'अ' वर्ग ऑडिट गटात येत आहे. संस्थेला इमारतीसाठी आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी निधी उपलब्ध करून दिला आहे.

संस्थेच्या अध्यक्ष व उपाध्यक्षपदाची पंचवार्षिक निवडणूक प्रक्रिया ग्रामपंचायतीच्या सभागृहात घेण्यात आली. यावेळी संस्थेचे सर्व 12 संचालक उपस्थित होते. अध्यक्षपदी गणेश गोरडे तर उपाध्यक्षपदी साहेबराव गोरडे यांची निवड झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी सुरेश कुलकर्णी व दिनकर गायकवाड यांनी जाहीर केले. निवडणुकीची कामकाज प्रक्रीया सचिव प्रभाकर गोरडे यांनी पुर्ण केली.

नवनिर्वाचित अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचा माजी अध्यक्ष सुदाम गोरडे व माजी सरपंच आप्पासाहेब गोरडे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. याप्रसंगी गोविंद गोरडे, प्रकाश गोरडे, श्रीकांत गोरडे, मारुती गोरडे, बाळासाहेब गोरडे, तानाजी गोरडे, दत्तात्रय गोरडे, दादाभाऊ गोगावले व दुध उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

# शाओमीतर्फे भारतात शाओमी 14 सीव्ही लॉन्च

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



शाओमी या तंत्रज्ञान आणि नाविन्य क्षेत्रातील आघाडीच्या कंपनी ने आज शाओमी 14 सीव्ही या आकर्षक आणि प्रतिथयश अशा शाओमी 14 मध्ये भर घातली आहे. लेशिया सह को इंजिनियर्ड अशा या शाओमी 14 सीव्ही ने मोबाईल इमेजिंग आणि स्मार्टफोन फोटोग्राफीची श्याओमीची परंपरा पुढे नेली आहे. शाओमी 14 सीव्ही मध्ये कॅमेऱ्याची कार्यक्षमता दुप्पट देण्यात आली असून त्याच बरोबर यामध्ये अजोडपणे आयकॉनिक डिझाईनची भाषा वापरून श्याओमी 14 सिरीजची परंपरा सुरु ठेवली आहे, यामुळे या फ्लॅगशिप भागात आता नवीन उत्क्रांती झाली आहे. यामुळे आता शाओमीच्या सध्याच्या प्रत्येकासाठी अत्याधुनिक नाविन्य देण्याच्या परंपरेला अबाधित राखण्यात आले आहे. शाओमी इंडिया चे चीफ मार्केटिंग ऑफिसर अनुज शर्मा म्हणाले " शाओमी 14 सिरीज मध्ये आम्ही स्मार्टफोन फोटोग्राफीच्या सीमा वाढवण्यासह नाविन्यपूर्ण डिझाईन आणि अजोड कार्यक्षमता दिली आहे. आम्ही नेहमीच आमची नाविन्यपूर्ण उत्पादने ही अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचवत असतो. शाओमी 14 सीव्हीच्या सुरुवाती मुळे आम्ही नाविन्याचे नवीन नियम पुन्हा लिहून स्मार्टफोन विभाग जे देऊ करत आहे त्याचे पुर्नंनिर्माण करत आहोत. यामध्ये संपूर्ण फ्लॅगशिप अनुभव मिळून रोजच्या वापरासाठी बेंचमार्क ओलांडून जाणारे आकर्षक डिझाईन या सर्व गोष्टी या विभागातील कॅमेऱ्याच्या माध्यमातून आम्ही देऊ केल्या आहेत. शाओमी 14 सीव्ही हा केवळ एक फोन नाही तर ते एक स्टेटमेंट आहे."

## थोडक्यात



### वर्ल्ड मराठा ऑर्गनायझेशनच्या शिबीरात 87 रक्तदात्यांचे योगदान

**पुणे लक्ष्मण साबळे (आरंभ पर्व) :** वर्ल्ड मराठा ऑर्गनायझेशन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने स्व.मराठा प्रवीण पोपट पिसाळ यांच्या पुण्यतिथी निमित्त पिंपरी चिंचवड येथे भव्य रक्तदान शिबिर आयोजित केले होते. या मध्ये पुणे पिपरी चिंचवड येथे वर्ल्ड मराठा ऑर्गनायझेशन टीम यांच्या वतीने कॉलिटी सर्कल एक्सेलन्स सेंटर टेल्को भोसरी येथे भव्य रक्तदान शिबिर आयोजित केले होते. या रक्तदान शिबिरात 87 रकतदात्यांनी रक्तदान केले. या प्रसंगी वर्ल्ड मराठा ऑर्गनायझेशन परिवारातील काही सदस्यांनी त्यांचे मनोगत मांडले व त्यांच्या कार्या विषयी माहिती दिली. रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी WMO कार्याध्यक्ष अवधुत सूर्यवंशी, प्रबंधक विशाल जाधव , अनिकेत जरे, प्राची खैरे, सिद्धार्थ तळेकर, अनिकेत चिखले, सुहास चव्हाण , आणि कल्याण बाबर , राज देशमुख सर ह्यांनी विशेष परिश्रम घेतले. वर्ल्ड मराठा ऑर्गनायझेशनच्या सदस्यांनी ह्यां उपक्रमाबद्दल आभार मानले.

# मुरलीधर मोहोळ यांच्याकडून पुणेकरांच्या वाढल्या अपेक्षा



**पुणे -लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**

नुकत्याच पुणे लोकसभा मतदारसंघातून भरघोस मताधिक्यांनी मुरलीधर मोहोळ यांनी विजयी मिळवला आहे. अगदी नशीबही एवढं चमकाव कीं थेट केंद्रीय मंत्रीपदी नियुक्ती व्हावी.त्यामुळे पुणेकरांमध्ये उत्साहाचं वातावरण सुरु आहे. एकेकाळी मंडळाचे अध्यक्ष ते केंद्रीय राज्य मंत्री पदाची धुरा संभाळणारे मुरलीधर अण्णा मोहोळ यांच्याकडून सर्वांच्या अपेक्षा वाढल्या आहेत.



देशात भाजपप्रणीत एनडीए सरकारला बहुमत मिळाले.नूतन सरकारचा शपथविधी नुकताच पार पडला.त्यामध्ये महाराष्ट्रातून मुरलीधर मोहोळ यांच्या रूपाने एक आश्चर्याचा धक्का देतं भाजपने थेट मंत्रीपदी संधी दिली.

प्रथमच स्वबळ सोडुन मित्रपक्षाच्या आधारावर सरकार स्थापन करणाऱ्या भाजपाने योग्य व प्रशासकीय यंत्रणेबाबतीत कामाची पध्दत यावरून मंत्रिपदे नियुक्त्या केल्याचे दिसते. मागील काही दिवसांपासून पुण्यातील काही (ड्रग्स,अग्रवाल,पुण्याची तुंबाई) घटनांनी राज्यभरासह देशात खळबळ माजवली आहे.

यावर स्थानिक खासदार म्हणुन मोहोळ काय भूमिका घेतात याकडेही बारीक लक्ष आहे.

दुसरीकडे भाजप एकसंध महाविकास आघाडी,चा धंगेकर पॅटर्न लोकभेप्रमाणेच विधानसभेत कसे रोखणार हे ही महत्वाचं आहे.

पुणे महानगरपालिकेत प्रशासकीय कारभार सुरु आहे.

### हे आहेत महत्वाचे प्रश्न

**वाढते शहरीकरणामूळे ट्रॅफिक, ड्रेनेज रस्ते रात्रीं उशिरापर्यंत चालणारे पब बार, पीएमपीएमएलच्या बसेसची वानवा, नवीन उद्योग आणणे, हिंजवडीतील कंपन्याचा विषय मार्गी लावणे, अपुरे प्रकल्प पूल बांधकामे अपुरे मेट्रो प्रकल्प यांसाररव्या विविध समस्यांवर लक्ष देणे गरजेचे आहे.**

मात्र अनेक भागातील पाणीपुरवठा रस्ते कचरा ड्रेनेज समस्याचा पाढा वाचला तर ग्रामपंचायतही बरी अशी नागरिकांची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

महापौर म्हणुन मोहोळ यांनी कोरोनाच्या महामारीमध्ये चांगले काम केले.त्यामुळे महानगरपालिका स्तरावरील सर्व यंत्रणा व इतर यंत्रणा कामाला लावून पुण्याची परिस्थती बदलवतील अशी आशा व्यक्त होत आहे.

देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या विकसित भारत योजनेचे उद्दिष्ट मोहोळ पुण्यात साध्य करतील.भाजपासाठी पुणे व परिसरात अनुकूल वातावरण करतील अशी शक्यता फडणवीस यांना वाटते त्यामुळे आपल्यां लाडक्या सहकारीस खासदारकीं बरोबर मंत्रीपद सोपवल्याची चर्चा सुरु आहे.

लोकसभेला जे झालं ते विधानसभेला होऊ नयेडॅमेज कंट्रोल करण्याचा प्रयत्न सुरु आहे. आगामी काळात निवडणुका आहेत त्यामुळं पुणेकरांचा विश्वास जिंकुन भाजपा पुन्हां रुळावर आणण्याचा चंग बांधला आहे.

त्याचाच प्रत्यय हा कसबा विधानसभेच्या लीडवरून दिसून आला.प्रतिस्पर्धी उमेदवार आ.रवींद्र धंगेकर यांच्या मतदारसंघांत त्यानी लीड मिळवत हम भी तयार हैं चा नारा दिला आहे.याचे विधानसभा निवडणुकांत पडसाद उमटणार का ?

आगामी काळात पुण्याचे राजकारण मोहोळ कसे हाताळतीलं त्यावर पुढील काळात नवीन गणिते आखली जाणार हे मात्र खरं आहे.

तोवर मंत्री म्हणुन मुरलीअण्णा यांच्याकडे सर्वांच्या खुप अपेक्षा आहेत.

# डायकिन तर्फे पुण्यातील कामकाजाचा विस्तार

- ग्राहक आणि भागीदारांना अधिक साहाय्य देण्याच्या आपल्या वचनबध्दतेअंतर्गत पुण्यात आणखी मोठ्या व अद्ययावत कार्यालयाद्वारे विस्तार
- 2025 पर्यंत 30 टक्के वाढीचे उद्दिष्ट
- 2025 पर्यंत उर्वरित महाराष्ट्रातून 800 कोटी महसूलाचे उद्दिष्ट




**पुणे (दै. आरंभ पर्व)** डायकिन इंडस्ट्रीज लि.जपान ची संपूर्ण उपकंपनी असलेल्या डायकिन एअरकंडिशनिंग इंडिया प्रा. लि.(डीएआयपीएल) या भारतातील एअरकंडिशनिंग क्षेत्रातील आघाडीच्या कंपनीने आपल्या अभिनवता आणि सेवा उत्कृष्टतेच्या प्रवासात महत्त्वाचा टप्पा गाठत विमाननगर (704 व 705ए,सातवा मजला ऑरविले बिझनेस पोर्ट,वेस्ट अॅव्हेन्यू रोड, कोणार्क एपिटोम समोर,विमाननगर,पुणे) येथे आपल्या नव्या ऑफिसचे आज उद्घाटन केले.

हे नवीन कार्यालय महाराष्ट्राचे सामर्थ्य व येथील ग्राहकांच्या प्रती कंपनीची वचनबध्दता दर्शविते. या नवीन जागेत सर्व उत्पादन विक्री,सेवा,तांत्रिक साहाय्य आणि इतर सहाय्यक सेवा यासारखे विभाग असणार आहेत, जे चॅनेल भागीदार आणि ग्राहक या दोघांसाठी सेवा देतील. कंपनी महाराष्ट्राकडे सर्वोच्च संभाव्य बाजारपेठ म्हणून बघत असून एकूण एसी बाजारपेठेत वर्चस्व राखण्यासाठी कंपनी बाजारपेठ विकसित करण्यासाठी गुंतवणूक करणे सुरु ठेवेल. आज डायकिनच्या उत्पादनांमध्ये डायकिन ग्लोबलची अतुलनीय गुणवत्ता टिकाऊपणा आणि किफायतशीर मालकी मिळते.

याप्रसंगी बोलताना डायकिन इंडियाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक कंवल जीत जावा म्हणाले की, आम्ही ही शताब्दी साजरी करत असताना, 1924 मध्ये डायकिनच्या स्थापनेपासून ते एचव्हीएसी उद्योगात जागतिक नेतृत्व बनण्यापर्यंतच्या प्रवासाबाबत आम्हाला अभिमान आहे. हा टप्पा केवळ आमच्या तांत्रिक प्रगतीचा दाखला नसून ग्राहक भागीदार आणि समर्पित कर्मचाऱ्यांचा अतुट विश्वास आणि पाठिंब्याचे प्रतीक आहे.

भारतात डायकिनने गुणवत्ता आणि अभिनवतेचे प्रतीक म्हणून आपली ओळख घराघरात प्रस्थापित केली आहे.भारतातील आमचा प्रवास अत्याधुनिक उत्पादन सुविधांची स्थापना,प्रगत उत्पादने आणि शाश्वततेसाठी दृढ वचनबध्दतेसह महत्त्वपूर्ण कामगिरीने समृध्द झाला आहे.

उत्कृष्टतेची 100 वर्षे साजरी करत असताना आम्ही एचव्हीएसी उद्योगात अभिनवता आणि शाश्वततेप्रती असणारी आमची कटिबध्दता अधोरेखित करत आहोत.भविष्यातील आमचे उपक्रम उर्जा,कार्यक्षमता वाढविण्यावर,पर्यावरणीय प्रभाव कमी करण्यावर आणि भारतातील ग्राहकांच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर लक्ष केंद्रित करतील.

भारताची झपाट्याने प्रगती होत असताना महाराष्ट्रात आणखी विस्तार करण्याचा आमचा दृष्टीकोन असून बाजारपेठेतील आणखी हिस्सा काबीज करण्यासाठी आमची नवीन उत्पादने महत्त्वाची ठरतील. नवीन कार्यालयासह आमच्या मजबूत डीलर नेटवर्कच्या माध्यमातून उच्च प्रशिक्षित विक्री सेवा आणि देखभाल नेटवर्कद्वारे ग्राहकांना अतुलनीय अनुभव देण्यासाठी वचनबध्द आहोत.

डायकिन इंडियाने गेल्या वर्षी 28 टक्के पेक्षा जास्त वाढ दर्शविली असून 2025 पर्यंत 16,000 कोटी रुपये महसूल मिळविण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. यासाठी आम्ही अनेक नवीन उत्पादने आणणार असून आमचे डीलर नेटवर्क मोठ्या प्रमाणावर विस्तारित करणार आहोत.पायाभूत सुविधा आणि गृहनिर्माण क्षेत्रात होणाऱ्या मजबूत विकासामुळे स्मार्ट आणि उर्जा कार्यक्षम एअरकंडिनिंग सोल्युशन्सची मोठी मागणी दिसून येत आहे.आर्थिक वर्ष 2024-25 च्या अखेरपर्यंत महाराष्ट्रातील 30 टक्के हिस्सा काबीज करण्यासाठी विपणन उपक्रमात गुंतवणूक करण्याचा आम्ही विचार करत आहोत.

डायकिन इंडियाने आंध्रप्रदेश येथील श्री सिटी येथील आपली नवीन सुविधा कार्यान्वित केली असून 75.5 एकर जागेत विस्तारित आहे. देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील वाढत्या मागणीची पूर्तता करण्यासाठी येथे उत्पादनांची निर्मिती केली जाते.एअरकंडिशनर्सच्या देशांतर्गत उत्पादनाला प्रोत्साहन देण्यासाठी सरकारने लागू केलेल्या एसी श्रेणीतील प्रॉडक्ट लिंक्ड इन्सेंटिव्ह (पीएलआय) कार्यक्रमात डायकिन हे प्रमुख गुंतवणूकदार आहेत.

## थोडक्यात




### अध्यक्षपदी अॅड. प्रसाद देशपांडे यांची निवड

**पुणे (आरंभ पर्व) :** महाराष्ट्र टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशनच्या अर्थात कर सल्लागार संस्थेच्या अध्यक्षपदी अॅड. प्रसाद देशपांडे यांची निवड झाली आहे. उपाध्यक्षपदी अॅड. अनुरुद्र चव्हाण, सचिवपदी ज्ञानेश्वर नरवडे, सहसचिवपदी सीएमए नवनाथ नलावडे, खजिनदारपदी कैलास काशीद यांची निवड करण्यात आली. संस्थेच्या 'ज्ञानमंदिर' सभागृहात नुकत्याच झालेल्या 44 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत 2024-25 या वर्षीच्या नवी कार्यकारिणी घोषित करण्यात आली. यावेळी संस्थेचे मावळते अध्यक्ष सीएमए श्रीपाद बेदरकर, माजी अध्यक्ष नरेंद्र सोनावणे, बी. एम. शर्मा, सीए सुनिल भांडवलकर, प्रकाश पटवर्धन, नवनीतलाल बोरा, मनोज चितळीकर, शरद सूर्यवंशी, अॅड. मिलिंद भोंडे, अॅड. दिपक गोडसे, संतोष शर्मा, विलास अहेरकर, सीए मुजुमदार, व्ही. एन. जोशी आदी मान्यवर उपस्थित होते. माजी अध्यक्ष अॅड. महेश भागवत, आयसीएआयच्या पिंपरी-चिंचवड शाखेचे माजी अध्यक्ष सीए सचिन बन्सल यांना कृतज्ञता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

### हृदयस्पर्शी स्वागताने 'सूर्यदत्त'मधील विद्यार्थी भारावले



**पुणे (आरंभ पर्व) :** शिक्षकांनी औक्षण, पाद्यपूजन करत विद्यार्थ्यांच्या गळ्यात मोत्यांच्या माळा घालत केलेल्या हृदयस्पर्शी स्वागताने बावधन येथील सूर्यदत्त नॅशनल स्कुलमधील विद्यार्थी भारावून गेले. शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे अनोख्या पद्धतीने स्वागत करण्यात आले. पारंपारिक स्वागताची सुरुवात शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी नम्रतेने, आदराच्या भावनेने विद्यार्थ्यांचे पाय धुऊन केली. या कृतीने मुलांना पवित्रता व निरागसतेचे स्वरूप कृतीतून दिसून आले. सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया, उपाध्यक्षा सुषमा चोरडिया, सहयोगी उपाध्यक्षा स्नेहल नवलखा, मुख्याध्यापिका शीला ओक यांच्या मार्गदर्शनाखाली या स्वागत सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. पाद्यपूजन, कपाळावर टिळा लावून विद्यार्थ्यांचे आवारात स्वागत केले. भारतीय संस्कृतीमध्ये हा क्षण शुभ प्रसंग, आशीर्वाद, समृद्धी व कल्याण याचे दर्शन घडवतो. यातून विद्यार्थ्यांमध्ये आपल्या संस्कृती, परंपरा याविषयी जाणीव होण्यासह आपुलकीची व सुसंवादाची भावना निर्माण होते.

# नोंदणी महानिरीक्षक सोनावणे यांना निलंबित करा

- रोहन सुरवसे पाटील यांची मागणी
- मुख्यमंत्री, महसूल मंत्र्यांना कारवाईसाठी निवेदन



"या प्रकरणामध्ये नोंदणी महानिरीक्षक डीआयजी व सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक यांच्यावर कारवाई व्हायला हवी. त्यामुळे त्यांचे तात्काळ निलंबन करून एसीबीमार्फत चौकशी करावी. त्यांना संरक्षण कोण देत आहे, याचा शोध घ्यावा. दुय्यम निबंधक यांच्या बदलीचा दर काही लाखाच्याही पुढे गेला आहे. असे सर्व सामान्य जनतेमधून बोलले जाते. हे पैसे वरती कोणाकोणाला दिले जातात, याचीही चौकशी झाली पाहिजे. त्यामुळे या सर्व प्रकरणाची शासन स्थरावर व आर्थिक गुन्हे शाखा व अँन्टीकरप्शन द्वारे चौकशी करावी," असे सुरवसे पाटील यांनी निवेदनात म्हटले आहे.

**पुणे (दै. आरंभ पर्व)** बेकायदेशीर केलेल्या प्रतिनियुक्त्या रद्द करून लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याअंतर्गत नोंदणी महानिरीक्षक हिरालाल सोनावणे, नोंदणी उपमहानिरीक्षक उदय चव्हाण, सहायक नोंदणी महानिरीक्षक किशोरकुमार मगर, श्रीमती कुलकर्णी, सोमनाथ जाधव यांचेवर फौजदारी स्वरूपाचा गुन्हे दाखल करून चौकशी करावी. तसेच हिरालाल सोनवणे यांचे तात्काळ निलंबन करावे, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे सरचिटणीस रोहन सुरवसे पाटील यांनी केली.

महसूल विभागातील या भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्याच्या मागणीसाठी सुरवसे पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री राधाकृष्ण विखेपाटील, महसूल सचिव व उपसचिव, तसेच अन्य संबंधित विभागांना निवेदन दिले आहे.

रोहन सुरवसे पाटील म्हणाले, "नोंदणी महानिरीक्षक कार्यालयातील भ्रष्टाचाराबाबत यापूर्वीही अनेकदा तक्रारी केलेल्या आहेत. दुय्यम निबंधक प्रशांत कुमठकर यांची मुळ नेमणुक विदर्भामध्ये होती. त्यांनी आपली नियुक्ती मुंबईत केली. त्यानंतर मोठी रक्कम घेऊन कुर्ला-4 येथे त्यांची नेमणुक केली. ही नियुक्ती बेकायदेशीर व नियमबाह्य होती. अखेर शासनाने ती रद्द केली. परंतु, रायगड जिल्ह्यातील दुसरी प्रतिनियुक्ती खालापूर येथे केली असून, अजुनही ती रद्द केलेली नाही. नागपुर येथील दुय्यम निबंधक यांना नोंदणी महानिरीक्षक कार्यालयामध्ये आणले व तेथून त्यांना नियमबाह्य व बेकायदेशीरपणे त्यांना खालापूर येथे नेमले या दोनच पोस्टींगमध्ये या तिघांनी काही कोटी रुपये कमाविले असल्याचा संशय आहे."

## आदेश कोणी दिला? हे देशाला समजले पाहिजे : दोलताडे




**पुणे (दै. आरंभ पर्व)** मराठ्यांचं वादळ धडकणार चित्रपटसृष्टीत घडवणार नवा इतिहास ,अभी नही तो कभी नही, मराठा आरक्षणासाठी संघर्ष करणारे मनोज जरांगे पाटील यांची जीवनकहाणी असलेला "संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील" हा चित्रपट आता 14 जून 2024 ला प्रदर्शित होत आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते अंतरवाली सराटी येथे या चित्रपटाचा ट्रेलर लॉंच करण्यात आला. चित्रपटाच्या धमाकेदार ट्रेलरमुळे चित्रपटाविषयी आता कमालीची उत्सुकता निर्माण झाली आहे. अख्खा महाराष्ट्र या चित्रपटाच्या टीमने प्रमोशनसाठी पिंजून काढला असून रसिक प्रेक्षकांकडूनही या चित्रपटला उत्तम प्रतिसाद मिळत आहे. शिवाजी दोलताडे यांनी दिग्दर्शनाची जबाबदारी निभावलेली असून सोनाई फिल्म क्रिएशन या निर्मिती संस्थेच्या गोवर्धन दोलताडे यांनी चित्रपटाच्या निर्मितीसह चित्रपटाचं लेखनही केलं आहे. सहनिर्माते रामदास मेदगे, विठ्ठल अर्जुन पचपिंड ,जान्हवी मनोज तांबे, दत्तात्रय लोहकरे कार्तिक दोलताडे पाटील, नर्मदा सिनेव्हिजन्स हे आहेत. तर डॉ.सुधीर निकम यांनी संवाद आणि पटकथा लिहिली आहे. या चित्रपटात मनोज जरांगे पाटील यांची मध्यवर्ती भूमिका अभिनेता रोहन पाटील यांनी साकारली आहे.

## डॉ. कोल्हे यांचा उरुळी कांचनच्यावतीने जाहीर नागरी सन्मान

**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)** शिव - शाहु - फुले - आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारांची समतेच्या संस्कारांची ज्योत अखंड तेवत ठेवणारे लोकनेते शरदचंद्र पवार यांच्या आशिर्वादाने शिरूर लोकसभा मतदारसंघातील मायबाप जनतेने दिलेली जबाबदारी मी कर्तव्य मानून निष्ठेने पार पाडणार. हा माझा एकट्याचा विजय नसून जनतेचा विजय आहे. महाविकास आघाडी मधील शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस, कॉंग्रेस, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना, सामान्य नागरिक सर्वांनी जिवाचं रान करून विजय साकार केला अशी भावना व्यक्त करतो महाराष्ट्राच्या स्वाभिमानासाठी हिच एकजूट कायम ठेवत येणाऱ्या आगामी विधानसभा निवडणुकीतही महाविकास आघाडीचा विजय साकार करू हा विश्वास आपणाला देतो. तसेच या परिसरातील प्रश्न सोडवण्यासाठी कटिबद्ध आहे असे मत शिरूर लोकसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित खासदार डॉ अमोल कोल्हे यांनी उरुळी कांचन (ता. हवेली) येथील जाहीर नागरी सत्कारला मार्गदर्शन करताना व्यक्त केले. यावेळी शिरूर-हवेलीचे आमदार अशोक पवार, जिल्हा अध्यक्ष जगन्नाथ शेवाळे, कॉंग्रेस प्रदेश उपाध्यक्ष देविदास भन्साळी, जेष्ठ नेते प्रा के डी कांचन, प्रकाश म्हस्के, सोपान कांचन, माधव काळभोर, प्रवक्ते विकास लवांडे, भारती शेवाळे, सोनबा चौधरी, सरपंच अमित कांचन, मा.उपसरपंच सागर कांचन, मयुर कांचन, सचिन कांचन, प्रताप कांचन, श्रीकांत मेमाणे, अर्जुन कांचन, रमेश मेमाणे, आशिष कांचन, बाळकृष्ण काकडे, अनिल जगताप, सनि चौधरी, नंदकुमार मुरकुटे, संतोष गायकवाड आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोनालिकाने 5.2 टक्के वाढीची केली नोंद




**पुणे (दै. आरंभ पर्व)** भारताचा क्रमांक एकचा ट्रॅक्टर निर्यात ब्रॅंड असलेल्या सोनालिकाने आपल्या हेवी ड्यूटी ट्रॅक्टरकरिता असलेली शेतकऱ्यांचे प्रेम व विश्वास यांना नेहमीच मोलाचे स्थान दिले आहे. आता मे 2024 महिन्यात वाढीची एक नवी कथा रचताना कंपनीला अत्यंत आनंद होत आहे. कंपनीने एकंदर 13,338 ट्रॅक्टरची विक्री करत 5.2 टक्के वाढीची नोंद केली असून उद्योगाच्या वाढीच्या दराला मागे टाकले आहे. सोनालिकाच्या दृष्टीने कृषी क्षेत्रात शेतकऱ्यांचा उद्धार हा आर्थिकदृष्टीने सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे. कंपनीच्या 20-120 एचपी गटातील हेवी ड्यूटी ट्रॅक्टरची संपूर्ण श्रेणी ही सर्वच बाबतीत ग्राहकांना सर्वोच्च समाधान देण्यासाठी तयार करण्यात आली आहे. भारतीय भूमीत पावसाळ्याचे आगमन झालेले असून सरासरीपेक्षा यंदा जास्त पावसाचा अंदाज आहे. त्यामुळे कृषीप्रधान अर्थव्यवस्था आणि शेतकऱ्यांसाठी वाढीव शेती उत्पादनाच्या आशा कायम आहेत. सोनालिका ट्रॅक्टर आर्थिक वर्ष 2025 मध्ये आक्रमकपणे आगेकूच करत असून तिने भारतीय शेतकऱ्यांसाठी नवयुगातील तंत्रज्ञानाला वैयक्तिक रूप देण्याची आपली सर्व धोरणे व ऊर्जा यांना कमाल पातळीवर आणले आहे. शेतकऱ्यांनी किफायती किमतीला सोनालिका हेवी ड्यूटी ट्रॅक्टर घेऊन आपल्या शेतीचे यांत्रिकीकरण करावे यासाठी कंपनीने नुकतेच 'जून जॅकपॉट' ऑफर सादर केली आहे. या नवीन कामगिरीबद्दल बोलताना, इंटरनॅशनल ट्रॅक्टर्स लिमिटेडचे संयुक्त व्यवस्थापकीय संचालक श्री. रमण मित्तल म्हणाले, खरीपाच्या हंगामाची सुरुवात झाल्याने ट्रॅक्टर खरेदीत वेग आला आहे. शेतीच्या यांत्रिकीकरणाच्या अपरिहार्य असा बदल हळूहळू आकाराला येत आहे, याचा आम्हाला आनंद आहे. कृषी अर्थव्यस्थेत उत्पादनामध्ये पावसाळ्याचे कळीची भूमिका असते आणि भारताच्या शेतीच्या परिस्थितीत केवळ नवीन युगातील तंत्रज्ञानाचा स्वीकार केल्यानेच मूलभूत बदल घडून येईल.

या उत्क्रांतीचे नेतृत्व करण्यात आम्ही अग्रभागी आहोत, ही आमच्यासाठी उत्साहाची बाब आहे आणि जून 2024 मध्ये शेतकऱ्यांसाठी अनुकूल अशी योजना आम्ही सादर केली आहे. पुढे जात असताना नवीन प्रगत हेवी ड्यूटी ट्रॅक्टर आम्ही सादर करत राहू."

# युनायटेड ब्रुअरीजने सादर केली क्वीनफिशर प्रीमिअम लागर बिअर




**पुणे (दै. आरंभ पर्व)** हायनिकन (Heineken) कंपनीचा भाग असलेल्या युनायटेड ब्रुअरीज लिमिटेडतर्फे महाराष्ट्रात हाऊस ऑफ किंगफिशरकडून क्वीनफिशर प्रीमिअम लागर बिअर : द क्वीन ऑफ गुड टाइम्स सादर करण्यात आली.

गोवा, आसाम आणि मेघालयमध्ये या बिअरला ग्राहकांचा सकारात्मक प्रतिसाद लाभला.

या सकारात्मक प्रतिसादाने प्रोत्साहित होत, मैत्रिणींमधील घट्ट नाते साजरे करण्याचे हे औचित्य नव्या बाजारपेठांमध्ये विस्तारीत करण्यासाठी यूबीएलने पाऊल उचलले आहे. क्वीनफिशरचे पॅकेजिंगमधून हे सर्वांना सोबत घेऊन जाण्याची भावना दर्शविण्यात आली आहे आणि भगिनीभावाच्या वृत्तीचा सोहळा आहे. यात तजेलदार जांभळ्या पार्श्वभूमीवर विविध महिलांचे तिमिरचित्र, तसेच आयकॉनिक मुकुटधारी वर मान असलेला किंगफिशर पक्षी आहे. आपल्या आयुष्यातील महिलांचा सन्मान करण्याचे हे प्रतीक आहे. किंगफिशरची मूल्ये हा क्वीनफिशरची संस्कृती असून या माध्यमातून अर्थपूर्ण आणि प्रामाणिक संभाषणाला सुरक्षित जागा उपलब्ध होते. समाजात स्त्रियांना अनेकदा तोंड द्यावे लागणाऱ्या पूर्वग्रहांची दखल या निमित्ताने घेण्यात आली आहे.

युनायटेड ब्रुअरीज लिमिटेडचे सीएमओ विक्रम बहल म्हणाले, "क्वीनफिशर हा सर्वसमावेशकता व महिलांमधील मैत्रीची न थांबवता येणारी शक्ती साजरी करण्याचा आमचा मार्ग आहे.

आम्ही फक्त स्त्रीत्व साजरे करण्यासाठी नव्हे तर दररोजच्या नात्यांमध्ये त्या वापरत असलेल्या सीक्रेट सुपरपॉवरचा सन्मान करण्यासाठी आमचे कॅन उघडतो. महाराष्ट्र हा कायमच महिला आणि सर्वसमावेशक समाज घडविण्यात आघाडीवर राहिला आहे. आम्ही आमचा भगिनीभावाचा सोहळा विस्तारीत करत आहोत, आमच्यातल्या क्वीन्सचा जय असो, ज्या जेव्हा एकत्र चमकतात तेव्हा अधिक उजळतेने तळपतात." सुरुवातीला हे उत्पादनत मार्चमध्ये गोव्यात लॉंच करण्यात आले. या लागर बिअरने ग्राहकांना मोठ्या प्रमाणात आकर्षित केले. या लॉंच इव्हेंटच्या वेळी आयकॉनिक कॅलेंडरचेही प्रकाशन करण्यात आले. याला आता गॅलेंडर म्हणतात आणि यात महिलांच्या खऱ्या आयुष्यातील क्षण टिपण्यात आले आहेत.

राजगुरुनगर नगर परिषद, राजगुरुनगर
ता.खेड, जि.पुणे.
निविदा सुचना क्रमांक – सन २०२४–२५

राजगुरुनगर नगरपरिषद, राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे यांचेकडुन राजगुरुनगर नगरपरिषदेच्या विविध कामांसाठी बी–१ नमुन्यातील निविदा महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदार, जे पूर्व अर्हता अटी पूर्ण करतील अशा ठेकेदारांकडून कामासाठी निविदा मागविण्यात येत आहे. या कामासंबंधिचा सविस्तर तपशिल शासनाच्या http://mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | बयाणा रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी (महिने) | ई–निविदा संचाची किंमत (ना–परतावा) धनाकर्षाद्वारे |
|---|---|---|---|---|
| १ | सर्वेक्षण व अन्वेषण करणे, प्राथमिक व अंतिम आराखडे तयार करणे आराखड्यांना आवश्यकते प्रमाणे नगररचना विभागाकडुन मंजुरी प्राप्त करुन घेणे. सविस्तर अचुक अंदाजपत्रके तयार करणे व त्यास शासनाची तांत्रिक मंजूरी प्राप्त करुन देणे, नगरपरिषदेस आवश्यकते प्रमाणे विविध तांत्रिक कामांचा अहवाल देणे, कन्सल्टिंग रिपोर्ट बनविणे. | १०,०००/– | (१ वर्ष) | १०००/– |

निविदा पत्रातील निविदेसंबंधीच्या अटी व शर्ती निविदा धारकास बंधनकारक असतील.

दिनांक : १४/०६/२०२४

सही/–
(श्रीकांत अण्णासाहेब लाळगे)
मुख्याधिकारी, तथा प्रशासक
राजगुरुनगर नगरपरिषद, राजगुरुनगर
ता. खेड, जि.पुणे

जा.क्र. :२११/२०२४ दिनांक :१३/०६/२०२४

# करण जोहर व मनीष मल्होत्रा यांच्या हस्ते लोगोचे अनावरण

- 'विकी' या पहिल्या मराठी चित्रपटाची घोषणा
- चित्रपट सृष्टीतील दिग्गजांकडून उषा काकडे यांचे निर्मिती क्षेत्रातील पदार्पणाबद्दल कौतुक



**पुणे (दै. आरंभ पर्व)** बांधकाम व्यवसाय व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या उषा काकडे यांनी चित्रपट निर्मिती क्षेत्रात पदार्पण केले असून, त्यांच्या 'उषा काकडे प्रॉडक्शन्स'च्या लोगोचे अनावरण प्रसिद्ध निर्माता-दिग्दर्शक करण जोहर व फॅशन डिझाइनर मनीष मल्होत्रा यांच्या हस्ते झाले. उषा काकडे प्रॉडक्शन निर्मित 'विकी : द फुल ऑफ लव्ह' या पहिल्या मराठी चित्रपटाची घोषणाही दोघांच्या हस्ते यावेळी क्लॅपिंग करून झाली.

मुंबईतील ताज लँड्स एंड येथे नुकत्याच झालेल्या या सोहळ्यात शर्मिला ठाकरे, अभिनेत्री इशा कोप्पीकर, सोनाली कुलकर्णी, रिंकू राजगुरू, स्मिता गोंदकर, तनिषा मुखर्जी, गौहर खान, लक्ष्मी नारायण त्रिपाठी, अभिनेता अभिजीत खांडकेकर, उद्योजक संजय काकडे, निर्माती उषा काकडे, 'विकी' चित्रपटाचे दिग्दर्शक तेजपाल वाघ, कलाकार हेमल इंगळे व अभिनेता सुमेध मुदगळकर, अशोक पंडित यांच्यासह हिंदी-मराठी चित्रपट सृष्टीतील दिग्गजांची उपस्थिती होती. करण जोहर म्हणाले, "चित्रपट निर्मितीसारख्या आव्हानात्मक क्षेत्रात उषा काकडे यांचे स्वागत व अभिनंदन करतो. माझा त्यांना नेहमीच पाठिंबा राहील. त्यांच्याकडून अनेक चांगल्या चित्रपटांची निर्मिती होईल. त्यांच्या पहिल्याच चित्रपटाचे नाव 'विकी' असून, आजवर ते नाव अनेकांसाठी 'लकी' ठरलेले आहे. मी मराठी चित्रपटांचा मोठा फॅन असून, या मोठ्या बॅनरखाली होत असलेल्या मराठी चित्रपटाचे क्लॅपिंग माझ्या हस्ते होत आहे, याचा आनंद वाटतो. मराठी चित्रपट जगभरात नावलौकिक मिळवत आहेत. महाराष्ट्रात आणि त्यातही मुंबईत राहत असल्याचा मला अभिमान वाटतो." मनीष मल्होत्रा यांनी काकडे यांच्या या नव्या उपक्रमाचे कौतुक केले. बांधकाम व्यवसाय आणि सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदान दिलेल्या उषा काकडे निर्मिती क्षेत्रातही आपला ठसा निश्चितपणे उमटवतील. अनेकांची मने जिंकण्याचा उषा काकडे यांचा प्रवास सुरू झाला असल्याचे त्यांनी सांगितले. उषा काकडे म्हणाल्या, "चित्रपटसृष्टीत पाऊल ठेवण्याचे स्वप्न खूप आधीपासून पाहिले होते. सामाजिक क्षेत्रात कार्य करताना आपल्याला जर अनेक लोकांपर्यंत योग्य मेसेज पोहोचवायचा असेल, तर चित्रपट हा एक उत्तम पर्याय आहे. अनेक नवनवीन समाजोपयोगी संदेश देणारे चित्रपट लोकांपर्यंत पोहोचवण्याचा आमचा उद्देश राहील. या नवीन प्रवासात माझ्या जवळचे स्नेही मला खूप प्रेम व शुभेच्छा देत आहेत. करण जोहर आणि मनीष मल्होत्रा यांच्या हस्ते या प्रॉडक्शन हाऊसचा शुभारंभ होतोय, ही आनंदाची गोष्ट आहे. 'विकी : द फुल्ल ऑफ लव्ह' असून हा चित्रपट 2025 मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला येईल."

बांधकाम क्षेत्रात गेल्या १८ वर्षांपासून कार्यरत असलेल्या उषा काकडे ग्रॅव्हिट्स फाउंडेशनच्याही संस्थापक आहेत. फाउंडेशनच्या माध्यमातून आजवर पाच लाख मुलांना सुरक्षित व असुरक्षित स्पर्शाचे ज्ञान, ८० हजार मुलांची मोफत दंततपासणी, एक लाख १० हजार मुलांचे डोळे तपासणी व शस्त्रक्रिया असे उपक्रम यशस्वीपणे राबविले आहेत. शिक्षण व आरोग्य क्षेत्रातील उपक्रमांसाठी युनिसेफ संस्थेसोबत भागीदारी करण्यात आलेली आहे. चित्रपटांमध्ये परिवर्तनाची शक्ती लक्षात घेऊन उषा काकडे यांनी गेली तीन वर्षे चित्रपट क्षेत्राचा सखोल अभ्यास केला व त्यानंतर या क्षेत्रात निर्माता म्हणून पदार्पण करण्याचे निश्चित केले. त्यांचे हे पाऊल त्यांच्यातील समर्पणाचे प्रतीक आहे. येत्या काळात अनेक चांगल्या कथा स्क्रीनवर आणण्यात त्यांचे योगदान राहील. शर्मिला ठाकरे, संजय काकडे यांनीही उषा काकडे यांच्या कार्याचे व पदार्पणाचे कौतुक केले. अभिनेता अभिजीत खांडकेकर यांनी सूत्रसंचालन केले.

## थोडक्यात




### रणवीर सिंगने ने केली व्हिक्स की गोली अब हो गयी है बडीची घोषणा

**पुणे (आरंभ पर्व) :** सुपरस्टार पावरहाऊस असलेल्या रणवीर सिंग ने आज व्हिक्सची 'सबसे बड़ी खबर'-'व्हिक्स की गोली अब हो गयी है बड़ी' जाहीर केली असून प्रथमच भारतातील आयकॉनिकत्रिकोणी असाव्हिक्स कफ ड्रॉप्स मध्ये प्रथमच डबल पावर्ड ट्रान्सफॉर्मेशन केले आहे. हा बदल जवळजवळ दोन दशकांनंतर पुन्हा करण्यात आला आहे. पीअ‍ॅन्डजी इंडिया च्या कन्झ्युमर हेल्थकेअर चे कॅटेगरी लीडर साहिल सेठी म्हणाले " अनेकभारतीय पिढ्यांना खिच खिच मुक्त आवाज देणाऱ्या लोकांना "व्हिक्स की गोली लो, खिचखिच दूर करो"हे जिंगल लगेच भूतकाळात घेऊन जाते. ग्राहकांना काय हवे हे जाणून घेण्याची आणि त्याच बरोबर उत्पादनाच्या फॉर्म्युलेशनसह पॅकेजिंग मध्ये बदल करण्याची आमची परंपरा सुरू ठेवत आम्ही दशकातील सबसे बडी खबर देतांना खूपच उत्साही आहोत. भारताच्या आयकॉनिक त्रिकोणी व्हिक्स कफ ड्रॉप्स ची पहिली अशी डबल पावर्ड ट्रान्सफॉर्मेशन ने युक्त व्हिक्स डबल पावर कफ ड्रॉप्सची सुरुवात आम्ही करत आहोत. घशाची जळजळ आणि खोकल्याच्या लक्षणांपासून मुक्त होण्यास मदत करू शकणाऱ्या त्यांच्या पसंतीच्या कफ ड्रॉपच्या मोठ्या आकारात ग्राहकांच्या अभिप्रायाच्या आधारे तयार केलेले अशी आमची नवीन 'विक्स डबल पॉवर कफ ड्रॉप्स' ही बड़ी गोली बडी राहत देते. आता विक्स की गोली खाओ, बडी.

### गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानित



**उरुळी कांचन(आरंभ पर्व) :** धकाधकीच्या जीवनात एखादी संस्था सामान्य ग्राहकांच्या अडचणी जाणून घेऊन त्यांच्यासाठी एक व्यासपीठ निर्माण करते ती संस्था म्हणजे लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था हे आवर्जून नमूद करावे लागेल खऱ्या अर्थाने सभासदांच्या विश्वासास सार्थ ठरली असल्याचे मत लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्थेचे संचालक शिवाजी माळी यांनी उरुळी कांचन (ता.हवेली) येथील लोकमंगल पतसंस्थेच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांच्या सन्मान कार्यक्रमाच्या निमित्ताने अध्यक्षीय भाषणात व्यक्त केले. यावेळी पुणे विभागीय आधिकारी कमलाकर पाटील, संस्थेचे सल्लागार सुलभा साळुंखे, रतिकांत यादव, संतोष चौधरी, नंदकुमार मुरकुटे, परीघा कांचन, अलका मदने, शुभांगी परिट, जेष्ठ समाजसुधारक डॉ रवींद्र भोळे, नितीन खैरे, शाखाधिकारी अभिजित साखरे, कर्मचारी मयुरी बोडके, मृणाल कांचन, सोनाली वाले, महेश फुलझळके, अनिकेत जगताप आदी विद्यार्थी पालक संस्थेचे सर्व कर्मचारी वर्ग सभासद उपस्थित होते. कु.समीक्षा सोनवणे इ.10 वी.96.40 टक्के, कु.स्मृती पवार इ.10 वी.95.00 टक्के, कु.श्रेया विभुते इ.10 वी.82 टक्के, कु.प्रज्वल भोसले इ.10 वी. कु.श्रेया पोपळघट इ.12 वी.91.83 टक्के, कु.हर्षल कड इ.12 वी.91.33 टक्के, कु.वेद कौलवार इ.12 वी.83.67 टक्के.. या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्षात इयत्ता 12 वी, इयत्ता 10 वी मधील यश संपादन केल्याने संस्थेच्या वतीने गौरविण्यात आले.. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शाखाधिकारी अभिजित साखरे यांनी तर प्रास्ताविक अनिकेत जगताप यांनी व सूत्रसंचालन अमोल भोसले यांनी मानले.

## आहारामध्ये समाविष्ट केले पाहिजेत पौष्टिक पदार्थ

**पुणे (दै. आरंभ पर्व)** आजच्या धावपळीच्या युगात, अनेक व्यक्ती व्यस्त जीवनशैली जगत आहेत, ज्याचा त्यांच्या हृदयाच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. कामाच्या निरंतर मागण्या, सतत डिजिटल कनेक्टीव्हीटी आणि काम व जीवन संतुलन राखण्याचा दबाव यामुळे गंभीर तणाव, चिंता होऊ शकते आणि स्वत:ची काळजी घेण्यासाठी वेळ देखील मिळत नाही. तसेच, तणावाशी संबंधित अनारोग्यकारक सवयी जसे अतिप्रमाणात आहाराचे सेवन, धूम्रपान किंवा अधिक प्रमाणात मद्यमान यामुळे गंभीर आजार होण्याचा धोका वाढू शकतो. यासोबत, उच्च तणाव आणि अनारोग्यकारक जीवनशैली निवडींमुळे हृदयविषयक आजार होण्याचा धोका वाढू शकतो. यामधून हृदयाचे आरोग्य उत्तम राखण्यासाठी तणाव व्यवस्थापन, नियमित व्यायाम आणि आधुनिक जीवनशैलीप्रती संतुलित दृष्टिकोन याप्रती महत्त्वपूर्ण गरज दिसून येते. हृदयाचे आरोग्य उत्तम राखण्यासाठी आहारामध्ये समाविष्ट केल्या जाणाऱ्या अनेक खाद्यपदार्थांपैकी 3 पौष्टिक पदार्थ पुढीलप्रमाणे : बदाम: आहारामध्ये समाविष्ट असलेच पाहिजे असे नट म्हणजे बदाम.



बदामांमध्ये कॅल्शियम, व्हिटॅमिन ई, मॅग्नेशियम आणि फायबर संपन्न प्रमाणात असतात. बदाम कोलेस्ट्रॉल पातळ्या कमी करण्यास मदत करू शकतात आणि हृदयविषयक आजाराचा धोका कमी करण्यासाठी आहारामध्ये आरोग्यदायी फॅट्स देऊ शकतात. बदाम आणि इतर नट्स देखील रक्तवाहिन्यांचे कार्य सुधारण्यामध्ये मदत करू शकतात, म्हणजेच ते रक्तवाहिन्यांचे कार्य सुलभ करण्यास आणि धमन्यांमधील ताठरपणा कमी करण्यास मदत करतात. तुम्ही कामाला जाण्यापूव सकाळी ब्रेकफास्ट म्हणून बदामांचे सेवन करू शकता किंवा दररोज सायंकाळचे स्नॅक म्हणून सेवन करू शकता.

ओट्स: ओट्समध्ये विरघळणारे फायबर असते, जे रक्तप्रवाहामध्ये कोलेस्ट्रॉलचे शोषण कमी करत बॅड एलडीएल कोलेस्ट्रॉल कमी करते.

## ओपन हार्ट सर्जरी न करता बदलली रक्त वाहिनीची झडप

**पुणे पिंपरी (दै. आरंभ पर्व)** डीपीयु सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, पिंपरी पुणे येथे नुकतेच TAVI आणि वॉल्व क्लिनिक सुरू करण्यात आले आहे . अद्ययावत वैद्यकीय तंत्रज्ञानानात अग्रेसर ट्रान्सकॅथेटर अ‍ॅओर्टिक वॉल्व इम्पांटेशन (टावी) ही प्रक्रिया अत्याधुनिक आहे. या प्रक्रियेद्वारे हृदयाला कुठलाही चिरा न देता, ओपन हार्ट सर्जरी न करता हृदयातून अन्य अवयवांना रक्तपुरवठा करणारी शुद्ध रक्तवाहिनी (अ‍ॅओर्टा) मधील वॉल्व (झडप) बदलविण्याची प्रक्रिया नुकतीच पिंपरी येथील डीपीयु सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल येथे 83 वर्षीय रुग्णावर करण्यात आली. ही या हॉस्पिटलमधील पहिलीच प्रक्रिया होती. मुख्य म्हणजे पूर्वी ही प्रक्रिया करण्यास ओपन हार्ट सर्जरी शिवाय पर्याय नव्हता. त्यामुळे वयस्क व सहव्याधी (कोमॉर्बिडिटी) असलेल्या रुग्णांवर ही प्रक्रिया शक्य नव्हती. या प्रक्रियेसह आता टावी व स्ट्रक्चरल हार्ट स्पेशलिस्ट, डीपीयु सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल TAVI आणि वॉल्व्ह स्पेशलिटी क्लिनिकचे संचालक डॉ. अनमोल सोनावणे यांनी डीपीयु सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलच्या सहकार्याने 'वॉल्व्ह क्लिनिक'ला सुरुवात केली आहे. हे क्लिनिक पुणे व पिंपरी शहरातील




रुग्णांना हृदयविकाराच्या अत्याधुनिक उपचारासाठी प्रत्येक सोमवारी उपलब्ध असेल.

83 वर्षीय रुग्ण चार महिन्यांपासून दम लागणे, श्वास भरून येणे, पायावर सुज अशा हृदयविकाराच्या लक्षणांनी सहा महिन्यांपासून ग्रस्त होता. त्यांच्या शुद्ध रक्तवाहिनीची झडप (अ‍ॅओर्टिक वॉल्व) बंद झाल्याने रक्तप्रवाहास अडथळा निर्माण झाला होता. विविध चाचण्या केल्यानंतर डॉ. अनमोल सोनावणे यांनी त्यांना वॉल्व बदलविण्याचे सुचविले. वय हे एक महत्त्वाचे फॅक्टर बघता 'ट्रान्सकॅथेटर अ‍ॅओर्टिक वॉल्व इम्पांटेशन' प्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला व कुठलीही चिरफाड न करता, हृदयावर शस्त्रक्रिया न करता वॉल्व बदलण्याची प्रक्रिया केली. रुग्णाला एक-दोन दिवसांनी इस्पितळातून सुटी देण्यात आली. आता 'ओपन हार्ट सर्जरी'द्वारे चिरफाड न करता देखील गुंतागूंतीची झडप बदलण्याची शस्त्रक्रिया आता डीपीयुमध्ये शक्य होत आहे.

रुग्णाचे वय आणि अन्य विकार बघता ओपन हार्ट सर्जरी करणे शक्य नव्हते. अशा वेळी ट्रान्सकॅथेटर अ‍ॅओर्टिक वॉल्व रिप्लेसमेंट एक प्रभावी उपचार आहे. यामध्ये अ‍ॅन्जियोग्राफी व अ‍ॅन्जियोप्लास्टी प्रमाणे हातातून एक नळी (कॅथेटर) रक्तवाहिनीद्वारे हृदयापर्यंत नेण्यात येतो. पेसमेकरद्वारे हृदयाची स्पंदने 250 बीट प्रति मिनिट पर्यंत वाढविण्यात येतात. हृदय स्थिर झाले की, कृत्रिम कॅथेटरद्वारे नेण्यात आलेल्या वॉल्वला हृदयात उघडण्यात येतो. कालांतराने तो स्थिर झाला की, कॅथेटर काढून घेतल्य जातो. विशेष म्हणजे ही शस्त्रक्रिया करण्यासाठी रुग्णास सुंगणी देण्याची गरज नसते. रुग्ण शुद्धीवर असताना ही प्रक्रिया होऊ शकते. चिरा देण्याची गरज नसल्याने रक्तस्त्राव होण्याचा धोका नसतो.

डॉ. अनमोल सोनावणे यांनी टावी आणि व्हॉल्व्ह रिप्लेसमेंट ही प्रक्रिया भारतात करण्यास सुरुवात केली. आतापर्यंत त्यांनी भारत आणि 36 देशांमध्ये 1500 हून अधिक शस्त्रक्रिया केल्या आहेत. हे तंत्र ज्येष्ठ नागरिकांमध्ये जगण्याची एक नवी आशा घेऊन आली आहे. डॉ. अनमोल सोनावणे यांनी आता डीपीयुसोबतच्या सहकार्याने वॉव्ह क्लिनिकला सुरुवात केली आहे; जे पुणे व पिंपरी चिंचवडच्या आरोग्य यंत्रणेत मोलाची भर घालेल.

या यशाबद्दल डॉ डी.वाय पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी.डी. पाटील यांनी अभिमान व्यक्त केला आणि ते म्हणाले की, आमचे ध्येय हे नेहमीच अत्याधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानाच्या साहाय्याने व कुशल तज् डॉक्टरांच्या मदतीने आम्ही रुग्णहित साद्य करण्यावर भर देत आहे. आज आधुनिक तंत्रज्ञानाने परिपूर्ण TAVI आणि वॉल्व्ह स्पेशलिटी क्लिनिकचा हृदयरोगाच्या रुग्णांना अधिकाधिक फायदा कसा होईल असे डॉ. पी.डी. पाटील म्हणाले.

डॉ. डी.वाय पाटील विद्यापीठाचे प्र-कुलपती डॉ. भाग्यश्री पी. पाटील यांनी या तंत्रज्ञानाबद्दल बोलताना सांगितले की, या नव्या वॉल्व क्लिनिकमुळे जागतिक स्तरावरील वैद्यकीय उपचार पुण्यात उपलब्ध करून देण्याचा एक नवा आयाम आम्ही सिद्ध केला आहे.

## स्कोडा ऑटो इंडियाने कुशक ओनिक्सला ऑटोमॅटिक ट्रान्समिशनसह सुसज्ज केले

- हे अपग्रेड या वेईकलला तिच्या विभागातील सर्वात किफायतशीर ऑटोमॅटिक बनवते
- कुशक ओनिक्स उच्च व्हेरिएण्ट्समधून सर्वात लाभदायी वैशिष्ट्यांचा शोध घेत असलेल्या ग्राहकांसाठी उच्च मूल्य पर्याय आहे
- विशेषत: 1.0 टीएसआय इंजिनसह उपलब्ध
- सिक्स-स्पीड मॅन्युअल ट्रान्समिशनसह उपलब्ध आहे आणि सिक्स-स्पीड ऑटोमॅटिकचे सादरीकरण

ŠKODA

**मुंबई (दै. आरंभ पर्व)** स्कोडा ऑटो इंडियाने सातत्यपूर्ण उत्पादन कृतींच्या धोरणांतर्गत आपल्या 5-स्टार सुरक्षित ताफ्यामध्ये आणखी एका सुधारणेची भर करत कुशक ओनिक्स एटी लाँच केली आहे. ओनिक्स मूळत: ग्राहकांच्या अभिप्रायानुसार 2023च्या पहिल्या तिमाहीत लाँच करण्यात आली होती, ज्यामागे स्कोडा चाहते व ग्राहकांना समाधान व उच्च मूल्य प्रदान करण्याचा मनसुबा होता. ग्राहकांकडून मिळालेल्या नवीन अभिप्रायाच्या आधारावर स्कोडा ऑटो इंडियाने आता ऑटोमॅटिक ट्रान्समिशन आणि अनेक नवीन वैशिष्ट्यांसह कुशक ओनिक्समध्ये अधिक सुधारणा केल्या आहेत, ज्यामुळे तिच्या विभागातील ही सर्वात किफायतशीर ऑटोमॅटिक आहे.

उत्पादन कृतीबाबत मत व्यक्त करत स्कोडा ऑटो इंडियाचे ब्रँड संचालक पीटर जनेबा म्हणाले, ओनिक्स व्हेरिएण्ट आमच्या लाइन-अपमध्ये प्रमुख भर राहिले आहे, ज्यामध्ये ॲक्टिव्ह ट्रिमच्या मूल्यासह उच्च व्हेरिएण्ट्समधील वैशिष्ट्यांचे संयोजन आहे. ग्राहकांकडून मिळालेल्या अभिप्रायानंतर ही नवीन कुशक ओनिक्स ऑफरिंग सादर करण्यात आली आहे, ज्यामधून अधिक किफायतशीर दरामध्ये ऑटोमॅटिक व्हेरिएण्टसाठी उत्तम मागणी दिसून येते. खरेतर, आमचे मूल्य तत्त्व या कुशकला तिच्या संपूर्ण विभागातील सर्वात किफायतशीर ऑटोमॅटिक बनवते. त्रास-मुक्त मालकीहक्क अनुभव देणे, ग्राहकांपर्यंतची पोहोच अधिक वाढवणे आणि सतत ग्राहकांचे अभिप्राय ऐकणे हा आमचा प्रयत्न आहे आणि आमच्या विकास धोरणाचा प्रमुख भाग आहे.

पूवच्या ओनिक्सप्रमाणे ओनिक्स एटी स्कोडाच्या सर्वाधिक विक्री होणाऱ्या एसयूव्हीच्या विद्यमान ॲक्टिव्ह व ॲम्बिशन व्हेरिएण्ट्स स्लॉटमध्ये सामील आहे. एक्स्टीरिअर्समध्ये उच्च ॲम्बिशन व्हेरिएण्टमधील वैशिष्ट्ये आहेत, ज्यामुळे ही सर्वोत्तम कुशक आहे. यापैकी काही वैशिष्ट्ये आहेत स्कोडा क्रिस्टललाइन एलईडी हेडलॅम्प्ससह डीआरएल. दृश्यमानता व सुरक्षिततेमध्ये अधिक वाढ करणारी वैशिष्ट्ये आहेत फ्रण्ट फॉग लॅम्प्ससह स्टॅटिक कॉर्नरिंग फंक्शन. मागील बाजूस वायपर आणि डिफॉगर आहे. या सुधारणांसह स्कोडा ऑटो इंडियाने या वेईकलमध्ये टेक्टॉन व्हील कव्हर्स आणि बी-पिलर्समध्ये ओनिक्स बॅजिंगची भर केली आहे.

ओनिक्स एटीच्या आतील बाजूस अधिक शाश्वत अपडेट्स करण्यात आले आहेत. यामध्ये अव्वलस्थानी आहे हिल होल्ड कंट्रोल आणि पॅडल शिफ्टर्स. ड्रायव्हरसाठी 2-स्पोक, मल्टीफंक्शन, लेदर स्टीअरिंग व्हीलसह क्रोम स्क्रॉलर आहे. केबिनमध्ये स्कोडा क्लायमेट्रॉनिकसह टच पॅनेल आहे आणि पुढील बाजूस असलेल्या स्कफ प्लेट्समध्ये ओनिक्स शब्द दिसून येतो. या कारच्या ग्राहकांना प्रमाणित म्हणून ओनिक्स-थीम कुशन्स व टेक्सटाइल मॅट्स देखील मिळतील. या उत्पादन अपडेटमधील नवीन वैशिष्ट्य म्हणजे ओनिक्स एटीमध्ये प्रमाणित म्हणून सहा एअरबॅग्ज आहेत.

ओनिक्स एटीमध्ये स्कोडा ऑटो इंडियाचे प्रमाणित 1.0 टीएसआय टर्बो-चार्ज्ड थ्री-सिलिंडर पेट्रोल इंजिन आहे. हे इंजिन 85 केडब्ल्यू (115 पीएस) शक्ती व 178 एनएम टॉर्कची निर्मिती करते आणि सिक्स-स्पीड ऑटोमॅटिक ट्रान्समिशनशी जोडलेले आहे. ग्लोबल न्यू कार असेसमेंट प्रोग्रामने ऑक्टोबर 2022 मध्ये आपल्या नवीन व कठोर प्रोटोकॉल्स अंतर्गत कुशकची क्रॅश चाचणी केली.

एसयूव्हीने प्रौढ प्रवासी सुरक्षिततेसाठी 34 पैकी 29.64 पॉइण्ट्स आणि मुलांच्या सुरक्षिततेसाठी 49 पैकी 42 पॉइण्ट्स मिळवले. कुशक प्रौढ व्यक्ती व मुलांच्या सुरक्षिततेसाठी सर्व फाइव्ह स्टार्स मिळवण्यासाठी पहिली मेड-इन-इंडिया कार होती.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.